**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२**

**लोककला आणि पथनाट्य पथक निवडसूची-२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्याच्या अनुषंगाने लोककला/पथनाट्याद्वारे करण्याकरिता (उदाहरणार्थ गण-गवळण, अभंग, पोवाडे, वगनाट्य, बहुरुपी, भारुड इ.) लोककला/पथनाट्य पथकांची निवडसूची तयार करण्यात येत आहे. तरी याबाबत सदर क्षेत्रातील अनुभवी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. पथकाला विविध विषयांवर (शासकीय योजनांसह) कार्यक्रम/पथनाट्य करण्याचा अनुभव असावा.
२. पथक किमान दहा जणांचे असावे. यामध्ये स्त्री-पुरुष, वादक यांचा समावेश असावा.
३. लोककला/पथनाट्य पथक ज्या जिल्ह्यातील असेल त्याच जिल्ह्यातून अर्ज दाखल करावा.
४. केंद्र सरकारच्या गीत व नाट्य विभागाकडे नोंदणीकृत असल्यास प्राधान्य.
५. संस्थेकडे स्वत:ची ध्वनीक्षेपण यंत्रणा असणे अपेक्षित आहे.

इच्छुक संस्थांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधून अर्जाचा नमुना व माहितीपत्रक प्राप्त करून घ्यावा. अर्जाचा नमुना व माहितीपत्रक www.maharashtra.gov.in आणि dgipr.maharashtra.gov.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

विहीत नमुन्यातील अर्ज भरुन संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांना दि. १ जानेवारी २०२१ ते २१ जानेवारी २०२१ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवावेत. मुंबई आणि उपनगरातील पथकांनी त्यांचे अर्ज उपसंचालक(माहिती), विभागीय माहिती कार्यालय, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे पाठवावेत.

स्थळ :
दिनांक : दि. १ जानेवारी २०२१

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ३२**

## लोककला आणि पथनाट्य निवडसूची- २०२१
## अर्जाचा नमुना

जिल्हा :

संस्थेचे नाव :

संस्थेचा पत्ता :

नोंदणी क्र . :

नोंदणी केलेल्या जिल्ह्याचे नाव :

संस्थेच्या अध्यक्षाचे नाव :

संपर्क क्रमांक :

संपर्कासाठी ईमेल आय डी- :

यापूर्वी सादर केलेल्या कार्यक्रमाचा तपशील:
(ज्या संस्थेमार्फत कार्यक्रम सादर केले त्या संस्थेचे नाव,
कार्यक्रमाचे विषय, सादरीकरणाचा महिना व वर्ष)

संस्थेकडे स्वतची ध्वनीक्षेपण यंत्रणा आहे का:? :

संस्थेकडे उपलब्ध कलाकारांची संख्या :

गीत व नाट्य विभागाकडे नोंदणीकृत आहे काय ? :
(असल्यास नोंदणी क्रमांक नमूद करावा)

स्थळ : स्वाक्षरी :
दिनांक : नाव :

**सोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. धर्मादाय आयुक्तांकडे/संस्था नोंदणी कायदा/सहकार कायदा अथवा दुकाने आस्थापना नोंदणी कायदा अथवा अन्य कायद्यान्वये नोंदणी केली असल्यास नोंदणीप्रत
२. ज्या संस्थेमार्फत यापूर्वी कार्यक्रम सादर केले आहे, त्या संस्थांची पत्रे
३. गीत व नाट्य विभागाकडे नोंदणी असल्यास नोंदणीप्रत

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२**

**माहितीपत्रक**

**लोककला आणि पथनाट्य निवडसूची २०२१**

शासनाच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी लोककलावंत हे महत्त्वाचे साधन आहे. विशेषत: ग्रामीण भागामध्ये लोककलावंतांमार्फत सादर केलेले कार्यक्रमांना अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो, तर शहरीभागात पथनाट्य प्रभावी ठरतात.

ग्रामीण भागामध्ये आठवडी बाजाराच्या दिवशी तसेच जत्रा/यात्रा आणि उत्सवाच्या वेळी ज्या ठिकाणी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर एकत्र जमतात त्या ठिकाणी लोककलावंतांमार्फत सादर केलेल्या कार्यक्रमांचा प्रभाव अधिक पडतो. त्यामुळे शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी हे प्रभावी साधन आहे. केंद्र शासनाचा गीत व नाट्य प्रभागाने अशा प्रकारची यादी आहे.त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील लोककला (जसे गण-गवळण, अभंग, पोवाडे, वगनाट्य, बहुरूपी, भारुड इ.) आणि पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थांची नव्याने यादी तयार करावयाची आहे.

जिल्हा माहिती कार्यालयातून सदर सूची तयार करण्यासाठी अर्जाचे नमुने उपलब्ध करुन देण्यात येतील. संबंधित संस्था भरलेले अर्ज संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडे सादर करतील. निकषास पात्र ठरणाऱ्या संस्थांना आवश्यकतेनुसार जिल्हा किंवा विभागीय पातळीवर सादरीकरणासाठी/मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. विभागीय संचालक/उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी, अन्य संबंधित अधिकारी, या क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा समावेश असलेली समिती संस्थांचे सादरीकरण पाहतील अथवा संस्थेच्या प्रमुखाची/मुख्य कलाकाराची मुलाखत घेऊन संस्थेची क्षमता अजमावतील. सदर समिती त्यांच्या अभिप्रायासह कार्यअहवाल मुख्यालयास सादर करील. अंतिमत: सुयोग्य संस्थांची निवड करुन लोककला आणि पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थांची निवडसूची तयार करण्यात येईल.

**कलापथकाची व्याख्या**

१.महाराष्ट्रात सादर केल्या जाणाऱ्या पारंपरिक लोककला अथवा त्यावर आधारीत कार्यक्रम(गण-गवळण, अभंग, पोवाडे, वगनाट्य, बहुरूपी, भारुड इ.

२.पथनाट्य

३.वरील दोन्ही व्यतिरिक्त समूहाने सादर केलेला कलाप्रकार. हा कलाप्रकार निवड समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यात येईल.

# वेळापत्रक

| क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १. | जाहिरातीचा दिनांक | दिनांक १ जोनवारी, २०२१ |
| २. | अर्ज /उपलब्ध | दिनांक १ जानेवारी, २०२१ ते २१ जानेवारी २०२१ |
| १. | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक १ जानेवारी, २०२१ ते २१ जानेवारी २०२१ |
| २. | अर्ज छाननी प्रक्रिया | दिनांक २२ जानेवारी, २०२१ ते २५ जानेवारी, २०२१ |
| ३. | जिल्हा स्तरावर सादरीकरण | दिनांक २७ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३ फेब्रुवारी , २०२१ |
| ४. | जिल्हास्तरावर निवडसूची निश्चितीचा दिनांक | दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ |

**१. अर्जांची छाननी करुन संस्थांची निवड**

खालील मुद्यांच्या आधारे संस्थांची निवड करण्यात येईल.

१. अर्ज करणारी संस्था मागील तीन वर्षापासून धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असावी.

२.संस्थेस विविध विषयांवर (शासकीय योजनांसह) कार्यक्रम/पथनाट्य करण्याचा अनुभव असावा.

३.संस्थेकडे स्वत:ची ध्वनिक्षेपण यंत्रणा असावी.

४.संस्थेचे स्वत:चे किमान दहा जणांचे पथक असावे.(ज्यात स्त्री-पुरूष कलावंत, गायक-वादक यांचा समावेश असावा.)

५.केंद्र शासनाच्या गीत व नाट्य प्रभाग, दूरदर्शन, आकाशवाणी यांच्यासाठी संस्थेने कार्यक्रम सादर केलेल्या अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

**मानधन**

कार्यक्रम सादर करण्यात आल्याची पडताळणी केल्यानंतर प्रत्येक पथकाला प्रती कार्यक्रम रु.५,०००/- इतके मानधन देय असेल. सदर मानधनाचा धनादेश संस्थेच्या / पथक प्रमुखाच्या नावे काढण्यात येईल किंवा ईसीएसद्वारे संस्थेला अदा करण्यात येईल.

लोककला व पथनाट्याकरिता संहिता लेखनाकरिता रु.२,०००/- इतके मानधन देण्यात येईल. (संहिता सक्षम अधिकारी/विषय तज्ज्ञ यांच्याकडून तपासून/मान्य करुन घ्यावी.)

लोककला व पथनाट्य पथकांना तालीमीकरिता रु.१०,०००/- इतके शुल्क अदा करण्यात येईल.यामध्ये प्रवास खर्च, अल्पोपहार, भोजन, जागेचे भाडे इ.याचा समावेश असेल हे शुल्क फक्त एकाच वेळेसाठी देण्यात येईल.

**निवडसूची कालावधी-**

लोककला पथक व पथनाटय पथक निवड सूचीचा कालावधी हा दोन वर्ष कालावधीसाठी राहील.

## मुलाखतीच्यावेळी सादर करावयाची कागदपत्रे

| | |
|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असल्यास त्याची कागदपत्रे |
| २ | संस्था किती वर्षापासून कार्यक्रम सादर करत आहे त्याचा तपशील व पुरावे |
| ३ | संस्थेने एका वर्षात सरासरी किती कार्यक्रम सादर केले आहेत ? त्याबाबतची माहिती व पुरावे |
| ४ | शासकीय योजनांसाठी कार्यक्रम केल्याचे अनुभव वर्षे/ संख्या |
| ५ | आकाशवाणीवर कार्यक्रम केल्याचा अनुभव वर्षे/ संख्या व त्याबाबतचे पुरावे |
| ६ | केंद्र शासनाच्या गीत व नाट्य प्रभाग यांच्या यादीवर पथक आहे का ? किंवा पूर्वी होते का ? असल्यास याबाबतचा पुरावा |
| ७ | संस्थेच्या पथकातील सहभागी कलाकारांच्या कला क्षेत्रातील पूर्व अनुभव (वर्ष/व्यक्तिगत सादरीकरण संख्या) |
| ८ | पथकला / पथकातील कलाकारांना मिळालेले शासकीय अथवा प्रथितयश पुरस्कार याबाबतचा पुरावा |
| ९ | पथकातील सर्व कलावंतांची नावे व पत्ता आधार क्रमांक व ई-मेल आयडी |

## मुलाखत गुण

| अ.क्र. | विवरण | गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असल्यास | १० | |
| २ | किती वर्षापासून कार्यक्रम करत आहे (एक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त १० गुण) | १० | |
| ३ | एका वर्षात सरासरी किती कार्यक्रम सादर करण्यात येतात ? (प्रत्येक जिल्ह्यासाठी वेगवेगळी आधारभूत संख्या (बेंचमार्क) असू शकते त्यामुळे सर्व अर्जदारांच्या सादरीकरणाच्या संख्येआधारे सरासरी संख्या लक्षात घ्यावी व त्यानुसार गुण द्यावेत.) | २० | |
| ४ | शासकीय योजनांसाठी कार्यक्रम केल्याचे अनुभव वर्षे/ संख्या | १० | |
| ५ | आकाशवाणीवर कार्यक्रम केल्याचा अनुभव | १० | |
| ६ | केंद्र शासनाच्या गीत व नाट्य प्रभाग यांच्या यादीवर पथक आहे का ? किंवा पूर्वी होते का ? | १० | |
| ७ | संस्थेच्या पथकातील सहभागी कलाकारांच्या कला क्षेत्रातील पूर्व अनुभव (वर्ष/व्यक्तिगत सादरीकरण संख्या) | २० | |
| ८ | पथकला / पथकातील कलाकारांना मिळालेले शासकीय अथवा प्रथितयश पुरस्कार | १० | |
| | एकूण गुण | १०० | |
| | मुलाखतीमध्ये सरासरी किमान ५०% गुण असणे आवश्यक आहे. | | |

**लोककला व पथनाट्य पथकाची निवड झाल्यानंतर सादरीकरणासाठी अटी**

१.प्रत्येक पथकामध्ये १० कलावंत असावेत. ज्यात स्त्री-पुरुष कलावंत, गायक-वादक (संगीत साहित्यासह) यांचा समावेश असेल. सादीकरणाचा कालावधी किमान ३० मिनिटांचा असवा.

२.एखाद्या जिल्ह्यातील लोककला आणि पथनाट्य संस्थेचा यादीत समावेश नसल्यास नजीकच्या जिल्ह्यातील मात्र त्याच विभागातील संस्थेला काम देण्यात येईल.

३. एका पथकाला एका दिवसात किमान दोन ते जास्तीत जास्त पाच कार्यक्रम देणे बंधनकारक असेल. (एकाच तालुक्यात असल्यास तीन प्रयोग ,वेगवेगळे तालुके असल्यास दोन प्रयोग)

४.सादरीकरणाचा पुरावा म्हणून पथक प्रमुख्याने जिल्हा माहिती कार्यालय अथवा जि.प. शाळा मुख्याध्यापक अथवा वर्ग एक वा वर्ग दोनचे अधिकारी अथवा संबंधित गावाचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यापैकी एकाचे प्रमाणपत्र सादर करावे. त्याचबरोबर सादरीकरणाचे मोबाईल किंवा कॅमेऱ्यावरील व्हिडिओ चित्रीकरण, फोटो (जीपीएस स्क्रीनशॉट) सादर करणे आवश्यक आहे.

५.कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी आवश्यक साहित्य (वाहन व्यवस्था, ध्वनीक्षेपण यंत्रणा, संगीत साहित्य, कलाकारांची वेशभूषा, बॅनर, कलाकारांना अल्पोपहार/भोजन इ.) पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

६.कार्यक्रमाच्या वातावरणनिर्मितीसाठी आवश्यक साहित्य (कलाकारांची वेशभूषा, बॅनर, संगीत साहित्य इ.) पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

७.कलापथकाने सादर केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल (सर्व छायाचित्रे, अभिप्राय यांचेसह) संबंधित कार्यालयास सादर करणे संबंधित संस्थेला बंधनकारक राहील.

८.ठरवून दिलेल्या ठिकाणी कार्यक्रमांचे सादरीकरण करतांना कलापथकांनी संबंधित शासकीय विभागांची मान्यता/सहमती  सहभाग घ्यावा.

९.संस्थेने जिल्ह्यातील यात्रा, धार्मिक महोत्सव, आठवडे बाजाराचा दिवस लक्षात घेऊन कार्यक्रमाचे ठिकाणे ठरवावेत.

१०.कार्यक्रमाच्या ठिकाणी कलाकारांनी कोणतेही गैरवर्तन करु नये.

**सदर निवड सूची प्रक्रिया रदद करणे किंवा त्यामध्ये बदल करणे याबाबत चे अधिकार मा.महासंचालक माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई यांचा राहिल.**